## महिला व बाल विकास आयुक्तालय,
## महाराष्ट्र राज्य, पुणे-१

२८ राणीचा बाग,जुने सर्किट हाऊस जवळ ,पुणे-४११००१

Email-dcmahilavikas@gmail.com दूरध्वनी क्रमांक - ०२० - २६३३००५२

जा.क्र.मबाविआ/म.वि/आदिशक्ती २०२५-२६/का-६/ ५४९ दिनांक - ०२/०२/२०२६

प्रति,

1. जिल्हाधिकारी, (सर्व जिल्हे)
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

विषय : राज्यात "आदिशक्ती अभियान" अंतर्गत ग्रामपंचायतींच्या मूल्यमापनासाठी विकसित करण्यात आलेल्या वेब पोर्टलवर माहिती भरण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत ...

संदर्भ : १. महिला व बालविकास विभाग,शासन निर्णय क्र आदिपू-२०२५/प्र क्र१५/का-१०, दि.२२.५.२०२५.

२. महिला व बालविकास विभाग,शासन निर्णय क्र आदिपू-२०२५/प्र क्र१५/का-१०, दि. १.७.२०२५.

३.आयुक्तालयाचे पत्र क्र.१८५/दि.१३.०१.२०२६

राज्यात महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण साध्य करण्याच्या उद्देशाने शासनाने सन २०२५-२६ पासून "आदिशक्ती अभियान" प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर अभियानांतर्गत ग्रामपंचायतींच्या कार्याची पारदर्शक, वस्तुनिष्ठ व गुणवत्ताधारित तुलना करता यावी, यासाठी **https://wcdadhishakti.in/** हे स्वतंत्र वेब पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे.

सदर वेब पोर्टलमध्ये शासन निर्णयात नमूद केलेल्या निकषांनुसार सर्व ग्रामपंचायतींनी आपले संपूर्ण अभिलेख व पुराव्यासह माहिती आदिशक्ती पोर्टलवर दिनांक 31 जानेवारी 2026 पर्यंत सादर करणे बाबत आपणास सूचित करण्यात आलेले आहे.

तथापि,ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुका आदर्श आचार संहिता विचारात घेऊन सदर पोर्टलवर आदिशक्ती अभियानांतर्गत संबंधित ग्रामपंचायत स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दि.१५.०२.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. यानंतर पोर्टल वर नोंदी बंद करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

(नयना अर्जुन गुंडे) भा.प्र.से
आयुक्त,
महिला व बाल विकास,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रत माहितीस्तव:- १.मा. सचिव, महिला व बाल विकास विभाग मंत्रालय,मुंबई,यांना सविनय सादर.

२. मा.विभागीय आयुक्त,महसुल विभाग (सर्व)

प्रत कार्यवाहीस्तव:-

१. विभागीय उपआयुक्त,महिला व बाल विकास विभाग(सर्व)